# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
**Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik**
सर्व्हे नं.६४८/ब २, फा. प्लॉट नं. ३११ पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी, नाशिक –४२२ ००२
दूरध्वनी : ०२५३-२९५९७८७ email : nmrda.nsk@gmail.com

## कार्यालयीन आदेश

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीमध्ये एकुण २७५ गावांचा समावेश असुन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार अस्तित्वातील व प्रस्तावित वर्गीकृत रस्त्यांचा विचार करुन, सदर गावांमध्ये प्राप्त होणा-या विकास परवानग्यांच्या प्रस्तावांना प्राधिकरण स्तरावर मान्यता देण्यात येते.

नाशिक महानगर प्राधिकरण क्षेत्रात होणा-या विकासाच्या वाढीचा विचार करता, नाशिक महानगरपालिका हद्दीतुन येणा-या रस्त्यांच्या जाळ्यांचे समन्वय साधुन सुनियोजन होणे आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याकरिता येणारी वाहतूक ही नाशिक प्राधिकरण क्षेत्रातून होणार असल्याने तसेच शिर्डी व ओझर विमानतळाहून होणा-या वाहतुकीचे नियोजन करण्याचे दृष्टीने व नाशिक प्राधिकरण क्षेत्रात वाढते औद्योगिकरण होत असल्याने, भविष्यात वाहतूक व्यवस्थापन सुनियोजीत होणेकरिता आत्ताच त्याबाबत विचार होऊन मोठ्या रुंदीचे रस्त्यांचे जाळे प्राधिकरण क्षेत्रात विकसीत होणे आवश्यक आहे.

प्राधिकरणाकडे विकास परवानगी मिळणेकामी प्राप्त होणा-या बहुतांश प्रस्तावाखालील जागांस, नजिकच्या सार्वजनिक रस्त्यालगत असलेल्या जागांतून संबंधित जागा मालकांच्या संमतीने पोहोच रस्ता उपलब्ध करुन घेण्यात येतो. प्रचलित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील तरतुदींनुसार आवश्यक उपलब्ध पोहोच रस्त्याच्या रुंदीनुसार प्रस्तावाधिन जागेत विकास परवानगी अनुज्ञेय करण्यात येते. त्याअनुषंगाने उपरोक्त परिच्छेदात नमूद भविष्यातील मोठ्या रुंदीच्या रस्त्यांची आवश्यकता विचारात घेता, सदर पोहोच रस्त्यांची किमान रुंदी ही १५ मी. इतकी असणे अनिवार्य राहील. तसेच काही अपरिहार्य भौतिक / भौगोलिक अडथळे जसे की, नदी, धरणे, डोंगर इ. बाबत महानगर आयुक्त यांच्या पुर्व मान्यतेने किमान १२ मी. इतक्या रुंदीचा पोहोच रस्ता संमतीने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

Metropolitan Region Development Authority ★ Nashik

जा.क्र.नामप्रविप्रा/कार्या.आदेश/ 822
दिनांक : 13/08/2024

13/8/25

(डॉ माणिक गुरसळ, भा प्र से)
**महानगर आयुक्त,**
**नाशिक महानगर प्रदेशविकास प्राधिकरण,**
**नाशिक**

कृ,मा.प.

जागामागणी पत्रव्यवहार

**प्रत कार्यवाहीस्तव:**

१) महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
२) सहमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
३) तांत्रिक शाखा, नगर नियोजन व विकास परवानगी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक
४) रेखाकला शाखा, नगर नियोजन व विकास परवानगी, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

**प्रत माहितीस्तव :**

१) क्रेडाई, नाशिक
२) न.रे.ङ.को., नाशिक
३) आर्किटेक्ट अॅन्ड इंजिनियर असोसिएशन, नाशिक
४) सर्व नोंदणीकृत अभियंता / वास्तुविशारद
५) NMRDA website
६) निवड नस्ती